पुढारी



पुणे : निवड झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत मान्यवर.

# 'देवचंद'च्या चार विद्यार्थ्यांची क्लब ऑफिसरपदी निवड

**निपाणी : पुढारी वृत्तसेवा**

देवचंद कॉलेज आणि क्विक हील फाऊंडेशन यांच्यातील सामंजस्य करारांतर्गत देवचंदच्या चार विद्यार्थ्यांची ऑफिसरपदी निवड झाली आहे. देवचंद कॉलेज आणि क्विक हील फाऊंडेशन यांच्यात नुकताच सामंजस्य करार झाला. या करारांतर्गत संगणकशास्त्र विभागातील चार विद्यार्थ्यांची क्विक हील फाऊंडेशन, पुणेतर्फे क्लब ऑफिसर म्हणून निवड करण्यात आली. क्लब ऑफिसर म्हणून निवड झालेलले ४ विद्यार्थी व १६ सायबर वॉरियर्स असे एकूण २० विद्यार्थी 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमात सहभागी होणार आहेत.

संगणकशास्त्र विभागातील अथर्व माने (प्रेसिडेंट), श्रावणी पवार (सेक्रेटरी), आलोक कांबळे (मीडिया डायरेक्टर), रुद्र सुतार (कम्युनिटी डायरेक्टर) आणि प्रा. प्रशांत कुंभार यांची या उपक्रमासाठी समन्वयक म्हणून निवड करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे ट्रेनिंग व ओरिएंटेशन विमाननगर (पुणे) येथील कंपनीच्या ऑफिसमध्ये पार पडले. अजय शिर्के, गायत्री केसकर-पवार आणि दिपू सिंग यांनी त्यांना मार्गदर्शन केले. कंपनीच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाचे हे तिसरे वर्ष असून मागील दोन्ही वर्षात या उपक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी विविध पुरस्कार पटकावले आहेत. या उपक्रमास ज. शि. मंडळाचे अध्यक्ष आशिषभाई शाह, उपाध्यक्षा डॉ. तृप्ती शाह, प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे, उपप्राचार्य डॉ. आर. के. दिवाकर यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन लाभले.

My Belgaum Edition
Jul 08, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com